दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४८४ वा • गुरुवार, ता. ०१ जानेवारी २०२६ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## सदानंद दाते राज्याचे नवीन पोलीस महासंचालक



**मुंबई । रयत समाचार**

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या पोलिस खात्यात मोठा प्रशासकीय फेरबदल करण्यात आला असून, ज्येष्ठ आयपीएस अधिकारी तथा माजी एनआयए प्रमुख सदानंद दाते यांची महाराष्ट्राचे नवे पोलीस महासंचालक (डीजीपी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याच्या डीजीपी रश्मी शुक्ला यांचा कार्यकाळ ता. ३१ डिसेंबर रोजी संपत असून, त्यांच्या जागी सदानंद दाते पदभार स्वीकारणार आहेत. राज्य सरकारने यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले आहेत. दाते हे ३ जानेवारीपासून औपचारिकरीत्या पदभार स्वीकारणार आहेत. १९९० बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले सदानंद दाते यांना अलीकडेच केंद्र सरकारकडून त्यांच्या मूळ महाराष्ट्र कॅडरमध्ये परतण्यास मान्यता देण्यात आली होती. यापूर्वी त्यांनी राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए)चे प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. तसेच महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे (एटीएस) प्रमुख, मुंबईचे सहपोलीस आयुक्त (गुन्हे) व सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) अशी महत्त्वाची पदे त्यांनी भूषवली आहेत. सदानंद दाते यांनी मीरा-भाईंदर व वसई-विरारचे पोलीस आयुक्त म्हणूनही काम पाहिले असून, मुंबई गुन्हे शाखेचे सहआयुक्त, सीबीआयमध्ये उपमहानिरीक्षक तसेच केंद्रीय राखीव पोलिस दलात (सीआरपीएफ) महानिरीक्षक म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. प्रशासन व कायदा-सुव्यवस्थेचा त्यांना मोठा अनुभव आहे. २००८ मधील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यावेळी कामा रुग्णालयात अजमल कसाबसोबत झालेल्या चकमकीत ते गंभीर जखमी झाले होते. त्या प्रसंगी दाखवलेल्या शौर्यासाठी त्यांना राष्ट्रपती पोलिस पदकाने सन्मानित करण्यात आले होते. या घटनेनंतर ते देशभरात चर्चेत आले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलिस महासंचालकांचा कार्यकाळ किमान दोन वर्षांचा असतो. रश्मी शुक्ला यांची जानेवारी २०२४ मध्ये डीजीपी म्हणून नियुक्ती झाली होती व त्यांना ३ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र आता नव्या निर्णयानुसार सदानंद दाते यांचा कार्यकाळ २०२७ च्या अखेरपर्यंत राहणार आहे. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या या बदलामुळे राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर लक्ष केंद्रीत राहणार असून, पोलिस प्रशासनात नव्या दमदार नेतृत्वाची सुरुवात झाल्याचे मानले जात आहे.

### मुलगा झाल्यानंतर आईचे मुंडन

## अनिष्ट प्रथेविरोधात जनजागृतीची गरज - राज्य महिला आयोग

**पुणे । रयत समाचार**

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

दौंड तालुक्यातील श्री रोटमलनाथ मंदिर परिसरात मुलगा झाल्यानंतर आईचे मुंडन करण्याची प्रथा सुरू असल्याबाबत गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने या अनिष्ट प्रथेविरोधात व्यापक जनजागृती करण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच या प्रथेचे समर्थन करणाऱ्यांवर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत कारवाई करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. पुणे येथील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या विभागीय कार्यालयात आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीस महिला व बालविकास विभागाचे पुणे विभागीय उपआयुक्त संजय माने, यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख, परिविक्षा अधिकारी बी. बी. घालमे, जिल्हा संरक्षण अधिकारी ए. सी. मोजर, समुपदेशक ए. जी. शिरसाठ, सरीता वाडेकर तसेच भरोसा सेलच्या पोलीस उपनिरीक्षक अनुराधा पाटील उपस्थित होते. राज्य महिला आयोगाकडे एका स्वयंसेवी संस्थेमार्फत तक्रार प्राप्त झाली असून, श्री रोटमलनाथ मंदिरात मुलगा झाल्यानंतर आईचे मुंडन करण्याची प्रथा प्रचलित असल्याचा उल्लेख त्यात करण्यात आला आहे. या प्रथेमुळे महिलांच्या आत्मसन्मानावर आघात होत असून, त्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला जात असल्याचे तक्रारीत नमूद आहे. या संदर्भातील प्रसारमाध्यमांत प्रसारित झालेल्या चित्रफितींचे अवलोकन केल्यानंतर तक्रारीत तथ्य असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत या प्रथेला पाठिंबा देणाऱ्यांविरोधात कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत बैठकीत मांडण्यात आले. तसेच स्वयंसेवी संस्था, समुपदेशक व पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून संबंधित गावात जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी समन्वय आणि सकारात्मक दृष्टिकोनाचे उदाहरण देत दौंड तालुक्यातील मौजे कुसेगाव येथे यात्रेनंतर होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत केलेल्या नियोजनाची माहिती दिली. यावर्षी गावकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने पशुहत्याबंदी जाहीर केल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच मौजे रोटी येथे सुरू असलेल्या मुंडन प्रथेप्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाच्या आदेशानुसार व कायदेशीर तरतुदींनुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी व पुढील कार्यवाही ठरविण्यासाठी २ जानेवारी २०२६ रोजी मौजे रोटी येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस तहसीलदार, गटविकास अधिकारी, यवत पोलीस निरीक्षक, बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण), तालुका संरक्षण अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका व आशा कार्यकर्त्या यांनी आवश्यक माहितीसह उपस्थित राहावे, असे निर्देश राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिले आहेत.



### एसटी बसस्थानकांसाठी

## १५ दिवसांनी विशेष स्वच्छता मोहीम

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांच्या सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी प्रवासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यभरातील सर्व एसटी बसस्थानकांवर तसेच बसस्थानक परिसर व प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळणार असून एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट होणार आहे. या विशेष मोहिमेत बसस्थानकांतील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे तसेच कार्यालयीन कक्ष यांची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. तसेच साचलेला कचरा, अनावश्यक झाडझुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी-जमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे. कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व विल्हेवाट लावण्यात येणार आहे. प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार असून पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. ही मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून व्यापक जनसहभाग निर्माण करण्यात येणार आहे. प्रत्येक बसस्थानकावर मोहिमेची काटेकोर अंमलबजावणी होईल, याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. दर १५ दिवसांनी राबविण्यात येणाऱ्या या स्वच्छता मोहिमेमुळे एसटी बसस्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार असून प्रवासी सेवेत गुणवत्तावाढ होण्यास मोठी मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा एसटीवरील विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# अरवली संरक्षण प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

## पर्यावरण रक्षणासाठी लोकचळवळ

**नवी दिल्ली । रयत समाचार**

अरवली पर्वतरांगांच्या संरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आपल्या आधीच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली असून, या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. अरवली पर्वतरांगांची नव्याने करण्यात आलेली व्याख्या पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते, अशी स्पष्ट चिंता न्यायालयाने व्यक्त केली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने अरवली क्षेत्रातील खाणकाम व पर्यावरणीय समतोल यावर भाष्य करताना सांगितले की, १०० मीटर उंची व दोन डोंगरांतील ५०० मीटर अंतर हे निकष लागू झाल्यास अरवली पर्वतरांगेचा मोठा भाग संरक्षणाच्या कक्षेबाहेर जाऊ शकतो. त्यामुळे अनियंत्रित खाणकामाला चालना मिळण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः राजस्थानमध्ये हजारो टेकड्यांपैकी मोजक्याच टेकड्या या निकषांमध्ये बसतील, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने २१ जानेवारीपर्यंत 'जैसे थे' स्थिती कायम ठेवण्याचे आदेश देत केंद्र सरकार व संबंधित राज्यांना नोटिसा बजावल्या आहेत. या निर्णयामुळे पर्यावरणवाद्यांना मोठा दिलासा मिळाला असून, निसर्ग संवर्धनाच्या लढ्याला नवी दिशा मिळाल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, गोव्यातही पर्यावरण रक्षणासाठी जनचळवळीचे वातावरण निर्माण होताना दिसत आहे. गोव्यातील डोंगर कापणी, जमिनींची बेसुमार विक्री आणि बेकायदा बांधकामांविरोधात निवृत्त न्यायमूर्ती फ ेर्दीन रेबेलो यांनी दिलेल्या आवाहनाला आता राजकीय पाठबळ मिळू लागले आहे. गोवा फॉरवर्ड पार्टीचे आमदार विजय सरदेसाई यांनी या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत, ''गोवा वाचवण्यासाठी लोकचळवळ हाच एकमेव मार्ग आहे,'' असे मत व्यक्त केले. शेती, पर्यावरण आणि स्थानिक युवकांच्या रोजगाराचे संरक्षण हा या लढ्याचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरजी पक्षाचे आमदार विरेश बोरकर यांनीही या मोहिमेला पाठिंबा देत जमिनींची विक्री थांबवणे आणि डोंगर कापणीवर बंदी घालणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांनीदेखील या आवाहनाला समर्थन देत गोमंतकीयांनी या विषयाकडे गांभीर्याने पाहावे, असे आवाहन केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा अरवली पर्वतरांगांबाबतचा निर्णय आणि गोव्यात उभारी घेत असलेली 'गोवा वाचवा' चळवळ, या दोन्ही घडामोडी पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरत असून, येत्या काळात या विषयावर मोठ्या जनआंदोलनाचे संकेत मिळत आहेत.



# रोहित पवारांच्या अडचणीत वाढ; केदार जाधव न्यायालयात

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे (एमसीए) अध्यक्ष रोहित पवार यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली असून, भारताचा माजी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी त्यांच्याविरोधात थेट न्यायालयात धाव घेतली आहे. एमसीएच्या कार्यकारिणीने नियम धाब्यावर बसवत मोठ्या प्रमाणात आजीव सदस्यत्व दिल्याचा आरोप करत केदार जाधव आणि लातूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष कमलेश ठक्कर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणीने अलीकडेच क्रिकेटशी थेट संबंध नसलेल्या सुमारे ४०० व्यक्तींना महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे आजीव सदस्यत्व दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. यातील बहुतांश सदस्य हे पवार यांचे नातेवाईक किंवा निकटवर्तीय असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. हे सदस्यत्व देताना सर्व नियम व प्रक्रिया डावलण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, ही बाब 'घराणेशाही'ला खतपाणी घालणारी असल्याचेही म्हटले आहे. यामुळे एमसीएच्या सदस्यसंख्येत मोठी वाढ झाली असून, पूर्वी १६३ असलेली सदस्यसंख्या थेट ५७१ वर पोहोचली आहे. ही संपूर्ण प्रक्रिया आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राबविण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, एमसीएची निवडणूक ६ जानेवारी रोजी होणार असून, त्याच दिवशी मतमोजणीही होणार आहे. त्यामुळे आता संघटनेचे भवितव्य न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून असल्याची प्रतिक्रिया माजी क्रिकेटपटूंनी व्यक्त केली आहे. धर्मादाय आयुक्तांच्या नियमांनुसार कोणत्याही संघटनेत नवीन सदस्य वाढवायचे असल्यास त्याचा ठराव प्रथम कार्यकारिणी बैठकीत मांडणे, त्यानंतर पुढील बैठकीत त्यास मंजुरी देणे आणि शुल्क भरल्यानंतरच तो वार्षिक सभेत मांडणे आवश्यक असते. मात्र, या सर्व प्रक्रियेचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. एमसीएची शेवटची बैठक १३ डिसेंबर रोजी पार पडली होती. या बैठकीत ऐनवेळी 'आयत्या वेळचा विषय' म्हणून सदस्यत्वाचा मुद्दा मांडण्यात आला. त्या वेळी एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने त्याला विरोध केला होता. मात्र, हा विरोध डावलून २५ डिसेंबर रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली. त्यानंतर २६ डिसेंबर रोजी केदार जाधव आणि कमलेश ठक्कर यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे हरकत दाखल केली होती. मात्र ती हरकत फेटाळण्यात आली. यानंतर अखेर न्यायालयात धाव घेत, नियमबाह्य पद्धतीने दिलेले सदस्यत्व रद्द करावे, तसेच निवडणूक प्रक्रियेवर स्थगिती द्यावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे महाराष्ट्र क्रिकेटच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, आगामी निवडणुकीपूर्वी वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बोगस बियाणे, कीटकनाशकांवर कडक कायदा करणार- केंद्रीय कृषीमंत्री चौहान




**अहमदनगर । रयत समाचार**

शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी केंद्र सरकार लवकरच बोगस बियाणे व कीटकनाशक कंपन्यांविरोधात कडक कायदा आणणार असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. निकृष्ट बियाण्यांमुळे पीक नुकसान झाल्यास संबंधित कंपन्यांकडून भरपाई व फौजदारी कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.। कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे झालेल्या शेतकरी संवादात त्यांनी महाराष्ट्रासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ३६७ कोटींचा निधी दिल्याची घोषणा केली. तसेच सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, खतांच्या काळाबाजारावर कारवाई आणि डीबीटीद्वारे थेट मदतीवर भर देण्यात येत असल्याचे सांगितले. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कृषी शिक्षणात आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमात लाभार्थ्यांचा सन्मान व कृषी यंत्रांचे वितरण करण्यात आले.

# महाराष्ट्राचे कॅलिफोर्निया गोठले, निफाडमध्ये तापमानाचा नीचांक


**नाशिक । शफीक बागवान**

महाराष्ट्राचे कॅलिफोर्निया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यात कडाक्याची थंडी अनुभवण्यास मिळत आहे. येथील पारा ४.५ अंश सेल्सिअस या हंगामातील नवीन नीचांकी पातळीवर पोहोचला असून हे राज्यातील सर्वात कमी तापमान असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. नाशिक शहरातही ६.९ अंश तापमानाची नोंद झाली. थंडीच्या तीव्र लाटेमुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे. निफाड आणि नाशिक शहराच्या तापमानात साधारणतः दोन ते तीन अंशांचा फरक कायम असतो. सध्या नाशिकमध्ये पारा ६.९ अंशांपर्यंत खाली घसरला. जो या हंगामातील नीचांक ठरला. याआधी नाशिकमध्ये गेल्या शुक्रवारी ७.८ अंश तापमानाची नोंद झाली होती. सातत्याने घसरणाऱ्या या पाऱ्यामुळे जिल्ह्यात हुडहुडी भरली असून नागरिकांना दिवसाही उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. हिवाळ्यात नाशिक जिल्ह्यात निफाडचे तापमान सर्वात कमी राहण्यामागे अनेक भौगोलिक कारणे असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. बागायती प्रदेश आणि सिंचनाची मुबलक व्यवस्था यामुळे या भागात आर्द्रता अधिक असते. कुंदेवाडी येथील कृषी संशोधन केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, निफाडची भौगोलिक रचना ही बशीसारखी आहे. या भागात डोंगर किंवा टेकड्या नसल्याने हा समतल परिसर आहे. उत्तर भारताकडून येणारे थंड वारे आणि जमिनीची जलधारण क्षमता यामुळे येथे थंड हवा साठून राहते.

थंड हवा ही उष्ण हवेपेक्षा जड आणि दाट असल्याने ती वातावरणाच्या खालच्या थरात स्थिरावते. गोदावरी, कादवा, दारणा, विनता या नद्यांचा संगम आणि नांदूर मध्यमेश्वर जलाशयाचे अस्तित्व यामुळे या परिसरात नैसर्गिकरीत्या थंडीसाठी पोषक वातावरण निर्माण होते. ज्या भागात वनस्पती आणि बारमाही शेती अधिक असते, तिथे सूर्यप्रकाश थेट जमिनीपर्यंत पोहोचण्यास अडथळे येतात, परिणामी तापमान कमी राहते असे वरिष्ठ संशोधक सहायक डॉ. भरत मालुंजकर यांनी स्पष्ट केले.

### द्राक्ष बागांवर थंडीचे सावट

**कडाक्याच्या थंडीचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः द्राक्ष पिकाला बसण्याची शक्यता आहे. तापमान पाच, सहा अंशांच्या खाली गेल्याने द्राक्ष मण्यांच्या विकासाची प्रक्रिया मंदावते. थंडीमुळे वेलींची अन्न साठवण्याची प्रक्रिया गोठते, ज्याचा थेट परिणाम मण्यांच्या आकारमानावर होतो. हवामानातील या बदलामुळे द्राक्षांवर 'भुरी' रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाल्याने उत्पादक धास्तावले आहेत.**





# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६



## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



### आश्वासनांची नव्हे, कामांची गरज; प्रभाग ७ साठी विकासाची नवी भूमिका

प्रभाग क्रमांक ७ हा विस्ताराने अत्यंत मोठा आणि सामाजिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रभाग आहे. या प्रभागात अती श्रीमंतांपासून ते गरीब, कष्टकरी नागरिकांपर्यंत सर्व स्तरातील लोक वास्तव्यास आहेत. त्यामुळे येथील समस्या देखील वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहेत. सावेडी गाव, भूतकरवाडी, जुना बोल्हेगाव रोड, भिल्ल वस्ती, धर्माधिकारी मळा, शिंदे मळा, वैदुवाडी, बोरुडे मळा, बालिकाश्रम रोड, झोपडी कॅन्टीन, प्रेमदान हडको असा मोठा आणि महत्त्वाचा परिसर या प्रभागात समाविष्ट आहे. दुर्दैवाने, आजपर्यंत निवडून आलेल्या नगरसेवकांनी या भागातील नागरिकांना केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले. स्वतःचा विकास करून घेतला गेला, मात्र सामान्य नागरिकांच्या पाणी, रस्ते, गटार, दिवाबत्ती, स्वच्छता अशा मूलभूत समस्या आजही जैसे थे आहेत. नागरिकांनी वारंवार आवाज उठवूनही त्यांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. यावेळी नागरिकांनी मला संधी दिली, तर मी केवळ प्रतिनिधी म्हणून नव्हे, तर आपल्या कुटुंबातील एक सदस्य म्हणून काम करेन. नागरिकांसाठी सदैव उपलब्ध राहणे, त्यांच्या अडचणी ऐकून घेणे आणि त्यावर तातडीने उपाययोजना करणे, हे माझे प्राधान्य असेल. पाणीपुरवठा, रस्ते, गटार, दिवाबत्ती यांसारख्या मूलभूत सुविधांसह महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा माझा ठाम निर्धार आहे. राजकारण म्हणजे केवळ सत्ता नाही, तर जबाबदारी आहे. प्रभाग क्रमांक ७ चा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची माझी तयारी आहे. त्यामुळे यावेळी नागरिक निश्चितच मला साथ देतील, असा मला विश्वास आहे.

**प्रभाग क्रमांक ७**
**सौ. श्रद्धा रवींद्र वाकळे**
**शिवसेना (शिंदे गट) उमेदवार**

# स्ट्राँग रूम व मतदान केंद्रांची तपासणी

## मुख्य निवडणूक निरीक्षकांकडून प्रक्रियेचा आढावा

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने मुख्य निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने, व्यवस्थापकीय संचालक वीज वितरण व पारेषण, छत्रपती संभाजीनगर तसेच श्रीमंत हरकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जळगाव यांनी शहरात भेट देऊन निवडणूक प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास भेट देत संपूर्ण निवडणूक प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती घेतली.



यावेळी स्ट्राँग रूमची तपासणी करून सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. स्ट्राँग रूममध्ये दरवाजे, खिडक्या तसेच सीसीटीव्ही यंत्रणा अद्ययावत स्वरूपात बसवण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. तसेच शहरातील आनंदनगर येथील शाळेमधील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील मूलभूत सुविधा, सुरक्षितता व्यवस्था आणि एकूण व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने केडगाव येथील पाच गोदामांमध्ये ठेवण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या (EVM) सुरू असलेल्या FLC (First Level Checking) प्रक्रियेची पाहणी करून आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी मनपा मुख्यालयात निवडणूक अधिकारी, आचारसंहिता नोडल अधिकारी, खर्च तपासणी पथक प्रमुख तसेच शहर पोलीस उपअधीक्षक यांच्यासोबत बैठक घेण्यात आली. मागील निवडणुकीतील मतदान टक्केवारीपेक्षा यंदा अधिक मतदान व्हावे यासाठी मोठ्या प्रमाणात उपक्रम (मतदार जनजागृती उपक्रम) राबविण्याच्या सूचना निरीक्षकांनी दिल्या. निवडणूक काळात अवैध हालचालींना आळा घालण्यासाठी महामार्गावरील तपासणी नाक्यांवर कडक वाहन तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच शहरातील संवेदनशील भागांची माहिती घेत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर पोलीस प्रशासनाशी सविस्तर चर्चा करण्यात आली. या पाहणी दौऱ्यावेळी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यशवंत डांगे, शहर पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक जगदीश भांबळ, कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक संभाजी गायकवाड, जल अभियंता परिमल निकम, शहर अभियंता मनोज पारखे, अभियंता श्रीकांत निंबाळकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## आधारकार्ड अद्ययावत प्रक्रियेतील जाचक अटींमुळे नागरिक हैराण

# शासनाच्या विविध योजनांच्या लाभांपासून अनेक लाभार्थी वंचित

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांच्या लाभांचे पैसे, आता थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत आहेत. यासाठी, केवायसी अनिवार्य करण्यात आली असल्याने आधारकार्ड, पॅनकार्ड व अन्य कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. परंतु, अनेक लाभार्थ्यांची कागदपत्रं सदोष असल्याने ती अद्ययावत करणे आवश्यक आहे. यापैकी आधारकार्ड हे कळीचे कागदपत्र ठरत आहे. कारण, सदोष आधारकार्ड दुरुस्त व अद्ययावत करण्यासाठी लाभार्थ्यांना अतिशय जाचक अटींचा सामना करावा लागत आहे.



आधारकार्डवरील जन्मतारीख पूर्ण करण्यासाठी किंवा बदल करण्यासाठी क्यू आर कोड दाखला अनिवार्य आहे. परंतु तहसील कार्यालय किंवा पंचायत समिती, आरोग्य विभाग या ठिकाणी जुन्या नोंदीचे अभिलेख ऑनलाईन नाहीत. जन्मतारीख अद्ययावत करण्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला किंवा वास्तविक (बोनाफाईड) पुरावा स्वीकारला जात नसल्याने लाभार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. नवविवाहित महिलांना जन्मतारीख पूर्ण करण्यासाठी व नावात बदल झालेला असल्यावर मोठी अडचण येत आहे. त्यांची जन्मतारीख पूर्ण करण्यासाठी व दोन नावाची एकच व्यक्ती असल्याचा पुरावा म्हणून विवाहनोंदणी किंवा शाळा सोडल्याचा दाखला या पुराव्यानुसार ते अद्ययावत होत नाही. आधारकार्ड संपूर्ण अद्ययावत करताना वयोवृद्ध व्यक्तींच्या बोटांचे ठसे स्पष्टपणे येत नसल्याने त्यांना चेहऱ्यावरुन आधारकार्ड अद्ययावत करून मिळणे गरजेचे आहे. परंतु, तो पर्याय या प्रक्रियेत उपलब्ध नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे अनुदान, नुकसान भरपाई, संजय गांधी निराधार व श्रावणबाळ व दिव्यांग निराधार योजनांच्या लाभार्थ्यांना या योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. या त्रुटींमुळे त्यांचे आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न होत नाही.

नांव पूर्ण करण्यासाठी, आधारकार्डच्या मागच्या बाजूला वडिलांचे किंवा पतीचे नांव असते, त्यानुसार संबंधीत व्यक्तीचे नांव पूर्ण करून मिळण्यासाठी इतर पुराव्याची अट रद्द करणे गरजेचे आहे. आधारकार्ड अद्ययावत केंद्रांची संख्या कमी असल्याने लाभार्थ्यांना वारंवार तालुक्याच्या किंवा जेथे आधारकार्ड अद्ययावत केंद्र आहे त्या ठिकाणी चकरा माराव्या लागतात. तसेच, ज्यांचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त आहे, परंतु अद्याप त्यांना आधारकार्ड नाही अशा व्यक्तींना आधारकार्ड काढण्यासाठी नवीन केंद्र पाथर्डी तालुक्याच्या ठिकाणी सुरु करणे गरजेचे आहे. या सर्व समस्यांची सोडवणूक करण्यासाठी अनेक जाचक अटींचा सामना करावा लागत असल्याने नागरिक बेजार झाले आहेत. राज्य सरकारने मोठा गाजावाजा करत सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेतील अनेक महिलांना याच कारणास्तव या योजनेतून वगळण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होईपर्यंतच ही योजना सुरू ठेवण्याचा छुपा अजेंडा असल्याने राज्य सरकारही या अडचणींना गांभीर्याने घेत नाही. तसेच यासंबंधीचे सर्व नियम केंद्र सरकारच्या अधीन असल्याने लाभार्थी हतबल झाले आहेत. त्यांचा आवाज अतिशय क्षीण असल्याने तो स्वयंघोषित विश्वगुरुंपर्यंत पोहचत नाही. यासाठी आता संबंधीत मतदारसंघातील लोकसभा सदस्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## शिवसेना शिंदे गटाच्या दोन पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी

**नगर । रयत समाचार**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) मध्ये मोठी शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत शिवसेना शिंदे गटाच्या दोन पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. ही कारवाई पक्षाच्या अधिकृत आदेशानुसार करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रमुख अनिल शिंदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

हकालपट्टी करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये युवा सेनेचे जिल्हा प्रमुख आकाश कातोरे आणि शहर प्रमुख महेश लोंढे यांचा समावेश आहे. महापालिका निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत भूमिकेच्या विरोधात जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केल्याने तसेच पक्षशिस्त मोडल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाकडून तब्बल ५४ जागांवर उमेदवार देण्यात आले असून, विविध प्रभागांमधून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. पक्षाने शहरातील सर्व प्रभागांमध्ये ताकदीने निवडणूक लढवण्याची तयारी केली असल्याचेही यावेळी स्पष्ट झाले आहे. या हकालपट्टीच्या कारवाईमुळे शिंदे गटात खळबळ उडाली असून, आगामी निवडणुकीत याचे राजकीय परिणाम दिसून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## अर्ज भरूनही माघार

# केडगावमधील कोतकर गटाच्या निर्णयाने मनपा निवडणुकीत उलथापालथ

**नगर । रयत समाचार**

केडगाव येथील भानुदास कोतकर गटाने महापालिका निवडणुकीतून अचानक माघार घेतल्याने शहराच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. निवडणूक प्रक्रियेच्या शेवटच्या टप्प्यात हा निर्णय घेण्यात आल्याने अनेक तर्कवितर्कांना उधाण आले असून, या माघारीमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

केडगावमधील दोन्ही प्रभागांतून ताकदीने निवडणूक लढवण्याची तयारी कोतकर गटाकडून सुरू होती. भाजपकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यानंतर कोतकर यांनी शिंदेंच्या शिवसेनेशी संपर्क साधत उमेदवारीबाबत चर्चा केली होती. त्यानुसार काही जागांवर उमेदवारी देण्याबाबत अंतिम टप्प्यापर्यंत हालचाली सुरू होत्या. इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्जही दाखल केले होते. मात्र अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशीच कोतकर गटाने निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली.



या निर्णयामुळे शिंदेंच्या शिवसेनेलाही मोठा धक्का बसला असून, इच्छुक उमेदवार व समर्थकांमध्ये नाराजी पसरली आहे. अनेक उमेदवारांना या निर्णयाची पूर्वकल्पना नसल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांनी ३० डिसेंबर रोजी सकाळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतल्याची माहिती आहे. या भेटीत निवडणुकीसंदर्भात सविस्तर चर्चा झाल्याचे सांगितले जाते.

या चर्चेनंतरच कोतकर यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. मात्र या माघारीमागील नेमके राजकीय कारण अद्याप उघड झालेले नाही.

कोतकर गटाच्या या अचानक निर्णयामुळे केडगाव परिसरातील निवडणुकीचे चित्र पूर्णतः बदलले असून, येत्या काळात याचे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

# प्रभाग ८ मध्ये वाकळे विरुद्ध कोलते सरळ लढत


**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत मंगळवारी संपल्यानंतर आज सकाळपासून अर्ज छाननी प्रक्रियेला सुरुवात झाली. विविध प्रभागांमध्ये उमेदवारांनी एकमेकांविरोधात हरकती दाखल केल्याने अनेक ठिकाणी छाननीची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू असल्याचे चित्र आहे. काही प्रभागांमध्ये छाननी पूर्ण झाली असून, तर काही ठिकाणी एबी फॉर्मवरील त्रुटी व तांत्रिक बाबींमुळे उमेदवार अडचणीत आल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक ८ मधील अर्ज छाननी पूर्ण झाल्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या प्रभागातील ड सर्वसाधारण प्रवर्गात आता केवळ दोनच उमेदवार रिंगणात राहिले आहेत. त्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कुमार बबनराव वाकळे आणि अपक्ष उमेदवार कोलते पोपट मुरलीधर यांची नावे वैध ठरली आहेत. शिवसेना (शिंदे गट) कडून उमेदवारी अर्ज दाखल केलेले राहुल कातोरे यांचे नाव वैध उमेदवारांच्या यादीत नसल्याने या प्रभागात आता थेट दोन उमेदवारांमध्येच लढत होणार आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक ८ मध्ये वाकळे विरुद्ध कोलते अशी सरळ निवडणूक रंगणार असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, इतर प्रभागांमध्येही अर्ज छाननीची प्रक्रिया सुरू असून, अनेक ठिकाणी हरकतींवर सुनावणी सुरू आहे. काही प्रकरणांमध्ये निर्णय रखडले असून, निवडणूक चित्र हळूहळू स्पष्ट होत आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




**निसार Art**
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
**चहा, कॉफी, लेमन टी**
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
**- संपर्क -**
**९०११९९३७००**


सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

## साकेगाव शिवारात बिबट जेरबंद; ग्रामस्थांचा सुटकेचा निश्वास

**पाथर्डी । नितीन गटाणी**

तालुक्यातील साकेगाव शिवारातील बांगर वस्ती परिसरात आज दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून भीतीच्या छायेत वावरणाऱ्या परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला असून, वनविभागाच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून या परिसरात अधूनमधून बिबट्याचे दर्शन होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सूर्यास्तानंतर संपूर्ण परिसरात शांतता पसरत असून नागरिकांचे दैनंदिन व्यवहारही विस्कळीत झाले होते. या पार्श्वभूमीवर वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे, वनपरिमंडळ अधिकारी बबन मंचरे, वनरक्षक वर्षा गीते, अप्पा घनवट, सागर साळवे आदी कर्मचाऱ्यांनी परिसरात पायपीट करत बिबट्याच्या हालचालींचा अभ्यास केला व ठसे तपासून योग्य ठिकाणी पिंजरा लावण्यात आला. सुमारे आठ ते दहा दिवसांपूर्वी हा पिंजरा लावण्यात आला होता. आज दुपारी भुकेच्या अवस्थेत भक्ष्याच्या शोधात असलेला बिबट्या पिंजऱ्यात अडकला. या कारवाईसाठी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी



सातत्याने परिसरात गस्त घालत विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, ग्रामस्थांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेत रात्री फटाके वाजवणे, टेंभे मिरवणे, वाद्य वाजवणे तसेच नाईट लॅम्पच्या प्रकाशझोतांच्या माध्यमातून बिबट्याचा शोध घेण्यास सहकार्य केले. वनविभागाच्या सतर्कतेमुळे आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे ही मोहीम यशस्वी ठरली.दरम्यान, रांजणी, केळवंडी, मोहरी व मढी या परिसरातही बिबट्याचा वावर असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून, त्या भागातही दक्षता घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात येत आहे. जेरबंद करण्यात आलेल्या बिबट्याची प्राथमिक वैद्यकीय तपासणी करून वरिष्ठांच्या आदेशानुसार त्याची सुरक्षितपणे संबंधित वनक्षेत्रात रवानगी करण्यात येणार आहे. दरम्यान, नागरिकांनी वनविभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे व सतर्क राहावे, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# न्यायालयीन आदेश असूनही वेतन थकीत

### आचारसंहितेनंतर ‘शिक्षक भारती’चा उपोषणाचा इशारा

**पुणे । रयत समाचार**

न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही शिक्षकांची थकीत वेतनदेयके व वैद्यकीय बिले गेल्या दोन वर्षांपासून मंजूर न झाल्याने ‘शिक्षक भारती’ संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, आचारसंहिता संपताच शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण छेडण्याचा इशारा दिला आहे. हा इशारा पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांना देण्यात आला आहे. पुणे येथील वाडिया कॉलेजमध्ये नुकत्याच पार पडलेल्या शिक्षक भारती संघटना व शिक्षण विभागाच्या सहविचार सभेत हा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. या बैठकीस उपसंचालक गणपत मोरे यांच्यासह अहिल्यानगरचे शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेतन अधीक्षक रामदास म्हस्के, लेखाधिकारी लहाने तसेच पुणे व सोलापूर विभागातील शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रलंबित प्रश्नांवर तीव्र भूमिका मांडत प्रशासनाला जाब विचारला. सभेत मांडण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये न्यायालयीन आदेश असूनही दोन वर्षांपासून रखडलेली थकीत वेतने व वैद्यकीय बिले तातडीने अदा करावीत, अशी ठाम मागणी करण्यात आली. तसेच नवीन नियुक्त शिक्षकांना शालार्थ आयडी मिळण्यास होणारा विलंब व त्यातील भ्रष्टाचार थांबवून प्रक्रिया पारदर्शक व ऑनलाइन करावी, प्रलंबित शालार्थ आयडी तात्काळ मंजूर करून २०/४०/६० टप्प्यानुसार वेतन सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली. मार्च २०२४ चा शाळांसाठी अडचणीचा ठरणारा शासन निर्णय (GR) रद्द करावा, संचमान्यतेतील वयोमर्यादेची अट शिथिल करून २००९ च्या शासन निर्णयानुसार ग्रामीण भागात



> ‘प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी न झाल्यास आचारसंहिता संपताच शिक्षण आयुक्त कार्यालयावर संपूर्ण ताकदीनिशी लाक्षणिक उपोषण करण्यात येईल. शिक्षकांच्या हक्कांसाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही.’
>
> **प्रा. महेश पाडेकर,**
> कार्याध्यक्ष, शिक्षक भारती

४० विद्यार्थ्यांची पहिली तुकडी ग्राह्य धरावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच NPS संदर्भातील हिशोबपत्रे उपलब्ध करून देणे, CHB शिक्षकांची प्रलंबित मान्यता व वेतन देणे, वेतननिश्चिती पडताळणीसाठी तालुकानिहाय शिबिरे आयोजित करणे, शिक्षकांना शालाबाह्य कामे देऊ नयेत, अशा मुद्द्यांवरही चर्चा झाली. याशिवाय २०१७ पासून वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण करूनही आर्थिक लाभ न मिळालेल्या शिक्षकांना तातडीने लाभ देण्याची मागणी करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान (IT) विषय शिकवणाऱ्या शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी व अनुदान देण्यात यावे, ‘सेल्फ फायनान्स’च्या नावाखाली शोषण थांबवावे, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. २००५ पूर्वी व नंतर सेवेत लागलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना (OPS) लागू करावी, तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत जाहीर केलेली कॅशलेस वैद्यकीय सुविधा प्रत्यक्षात राबवावी, अशी मागणीही करण्यात आली. संचमान्यतेमुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांचे तातडीने व सन्मानपूर्वक समायोजन करावे, तसेच नव्या आकृतीबंधानुसार कमी करण्यात आलेली पदे (प्रयोगशाळा सहाय्यक, शिपाई आदी) पुन्हा कायम ठेवावीत, अशी भूमिका संघटनेने मांडली. अनेक वर्षांपासून शिपाई व लिपिक पदांची भरती बंद असल्याने विद्यमान कर्मचाऱ्यांवर प्रचंड कामाचा ताण येत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. यावेळी शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांनी सर्व प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. मात्र प्रशासनाकडून वेळकाढूपणा सुरू राहिल्यास आचारसंहिता संपताच तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिक्षक भारतीने दिला आहे. या बैठकीस शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, पुणे जिल्हाध्यक्ष राजीव शिरसाठ, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष प्रा. रामराव काळे, विनाअनुदानित कृती समितीच्या राज्याध्यक्षा रुपाली कुरुमकर, संघटक चंद्रशेखर हासे, पाथर्डी तालुकाध्यक्ष अकील फकीर, राजगुरुनगर महिला तालुकाध्यक्ष पुष्पा म्हसे, मार्गदर्शक विजय पांडे, प्रवीण मालुंजकर, संतोष नवले, दीपक फापाळे, बेल्हेकर सर आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनोहर पोटे यांची एंट्री रोखण्यासाठी विरोधक सक्रिय

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



श्रीगोंदा नगर परिषदेच्या झालेल्या निवडणुकीत मनोहर पोटे यांना रोखण्यात भाजपला यश आले असले, तरी मनोहर पोटे यांच्या नेतृत्वाखाली जवळपास निम्मे नगरसेवक निवडून आल्याने त्यांची स्वीकृत नगरसेवकपदी वर्णी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवसेनेकडून याबाबत स्पष्ट संकेत मिळत असल्याने, त्यांना सभागृहात प्रवेश मिळू नये यासाठी विरोधकांची यंत्रणा कामाला लागल्याची चर्चा सध्या शहरात सुरू आहे.

श्रीगोंदा नगर परिषदेत भाजपचे १३ तर शिवसेनेचे ९ नगरसेवक निवडून आले आहेत. भाजपने आपल्या नगरसेवकांची गटनोंदणी पूर्ण केली असून, शिवसेनेची गटनोंदणी करण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. येत्या दोन दिवसांत शिवसेनेची गटनोंदणी पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विषय समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यासाठी गटनेत्याची निवड आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, शिवसेनेचे नगरसेवक फोडण्यासाठी विरोधकांची यंत्रणा सक्रिय झाल्याची चर्चा आहे. मात्र, शिवसेनेचे नगरसेवक आम्ही सर्वजण एकसंघ असून पुढेही एकसंघच राहू, असा दावा करत असल्याचे संपर्क साधल्यावर त्यांनी स्पष्ट केले आहे.



## विविध गुणदर्शन स्पर्धेत नायगाव शाळेचे यश

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

गोंडेगाव येथे झालेल्या तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नायगाव जुने येथील तीन विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला असून ते जिल्हास्तर स्पर्धे साठी पात्र ठरले आहेत. किलबिल गटातील वक्तृत्व स्पर्धेत आर्या सागर लहारे हिने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. तसेच किलबिल गटातील हस्ताक्षर स्पर्धेत रोहित विश्वंभर दातीर याने, तर बालगटामध्ये वेद गंगाराम नजन याने प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना रेहाना मुजावर शेख तसेच मुख्याध्यापक शाकीर शेख यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल निमगाव खैरी केंद्राचे केंद्रप्रमुख बाबासाहेब पिलगर, केंद्र समन्वयक वाघुजी पटारे, विस्तार अधिकारी दीपक त्रिभुवन तसेच गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे यांनी अभिनंदन केले. तसेच नायगाव जुने येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्य, सहकारी संस्थेचे चेअरमन व व्हाइस चेअरमन, पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, गावातील तरुण मंडळ, पालकवर्ग व सर्व ग्रामस्थांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आबासाहेब काकडे विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

पुस्तकांच्या चौकटीपलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सर्जनशीलतेला व्यासपीठ देणारे वार्षिक स्नेहसंमेलन आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेवगाव येथे उत्साहात साजरे करण्यात आले. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध शैक्षणिक व कलात्मक प्रदर्शनांमुळे संपूर्ण विद्यालय परिसर ज्ञान, रंग आणि सर्जनशीलतेच्या उत्सवात न्हाऊन निघाला होता.



स्नेहसंमेलनाच्या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी सादर केलेले गणितविज्ञान प्रयोग, नाविन्यपूर्ण उपकरणे, आकर्षक रांगोळ्या, मेहंदी डिझाईन्स, चित्रकला तसेच हस्तकलेचे नमुने पाहून उपस्थित मान्यवर भारावून गेले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि कौशल्याचे प्रभावी दर्शन या प्रदर्शनातून घडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य संपत दसपूते यांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन केले. ‘‘शालेय जीवनात अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतात तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक ठरतात,’’ असे त्यांनी नमूद केले. गणितविज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन नगरसेवक अमर पुरनाळे, रिझवान शेख व शेवगाव तालुका गणितविज्ञान संघटनेचे अध्यक्ष नानासाहेब कोटे यांच्या हस्ते झाले. रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन नगरसेविका शिवानी काथवटे, सामाजिक कार्यकर्त्या गंगुबाई आधाट व उपमुख्याध्यापिका मंदाकिनी भालसिंग यांच्या हस्ते पार पडले.

मेहंदी प्रदर्शनाचे उद्घाटन रेखा कुसळकर, अनिता तरटे तसेच प्राथमिक विद्यामंदिर, शेवगावच्या मुख्याध्यापिका प्रवीण पटेल यांच्या हस्ते करण्यात आले. तर चित्रकला व हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन नगरसेवक आशुतोष डहाळे व लाला शेठ धुत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गरड यांनी केले. यावेळी उपस्थित पालक, शिक्षक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मुक्तकंठाने कौतुक केले. ‘‘अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशील विचार, संघभावना व आत्मविश्वास विकसित होतो,’’ असे मत त्यांनी व्यक्त केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## ‘लेक लाडकी माझ्या गावची’ मांजरसुंबा ग्रामपंचायतीचा अभिनव उपक्रम

**नगर तालुका । रयत समाचार**

मुलीच्या जन्माकडे पाहण्याची समाजातील नकारात्मक मानसिकता बदलावी, तसेच ‘मुलगी म्हणजे ओझे’ ही धारणा दूर व्हावी, या उद्देशाने अहिल्यानगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा ग्रामपंचायतीने स्तुत्य उपक्रम राबविला आहे. ‘लेक लाडकी माझ्या गावची’ या उपक्रमांतर्गत मुलीच्या जन्माचे स्वागत लक्ष्मीच्या पावलांनी करण्यात येत असून, मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियानाअंतर्गत ३१ डिसेंबर रोजी गावातील नवजात ८ मुली व त्यांच्या मातांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत सरपंच रुपाली कदम यांच्या हस्ते प्रत्येक कन्येला एक हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरव करण्यात आला. मुलीच्या जन्माला आनंदाने स्वीकारण्याची भावना निर्माण व्हावी, तसेच स्त्री-पुरुष समानतेचा संदेश समाजात रुजावा, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले. या उपक्रमामुळे मुलींचा जन्मदर वाढण्यास व सामाजिक दृष्टिकोन सकारात्मक होण्यास निश्चित मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. मांजरसुंबा ग्रामपंचायतीच्या वतीने गावात सातत्याने विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येतो. तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा त्यांच्या योगदानाबद्दल दरवर्षी गौरव करण्यात येतो. या कार्यक्रमास उपसरपंच जालिंदर कदम, ग्रामविकास अधिकारी सारिका वाळुंज, सहाय्यक कृषी अधिकारी सुविधा वाणी, छाया कदम, मंगल कदम, लंका कदम, जयश्री कदम, सुनीता कदम, वैशाली आढाव, जयश्री वाघमारे, ज्योती वाघमारे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यू आर्टस् महाविद्यालयात मधुमक्षिका पालन प्रशिक्षण सुरू

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेतीपूरक व्यवसायातून स्वावलंबन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे पाच दिवसीय मधुमक्षिका (मधमाशी) पालन प्रशिक्षण शिबिर न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथे उत्साहात सुरू झाले आहे. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या या महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग, केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे तसेच युगंधर फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन वृक्षपूजन करून करण्यात आले असून, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. शिबिराच्या मुख्य प्रशिक्षक प्रा. रेश्मा माने यांनी मधुमक्षिका पालनामागील शास्त्रीय प्रक्रिया, मधमाश्यांचे पर्यावरणातील अनन्यसाधारण महत्त्व तसेच जैवविविधता संवर्धनातील



त्यांची भूमिका सविस्तरपणे स्पष्ट केली. तसेच प्रा. दत्तात्रय चौगुले यांनी मधुमक्षिका पालन हा अल्प भांडवलातील लाभदायक व्यवसाय ठरू शकतो, असे सांगत युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी अधोरेखित केल्या. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी, ‘‘पृथ्वीवरील जीवनचक्र टिकवण्यासाठी मधमाश्यांचे अस्तित्व अत्यावश्यक असून, अशा प्रशिक्षण शिबिरांमधून पर्यावरणपूरक विचारांची पेरणी होते,’’ असे प्रतिपादन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. उषा शेरखाने, भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. विजय देवरे, क्रीडा संचालक डॉ. डी. एम. लोखंडे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. छाया भालशंकर, प्रा. मिनाक्षी चक्रे यांच्यासह अनेक प्राध्यापक उपस्थित होते. शिबिराचे प्रास्ताविक समन्वयक प्रा. सचिन पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा मालुसरे व कु. किरण साळवे यांनी केले, तर आभार प्रा. मृणाली जाधव यांनी मानले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. संतोष उगलमुगले, प्रा. सुशीलकुमार शिंदे, प्रा. दत्तात्रय भुसारी, प्रा. संतोष बंगरे, प्रा. अल्ताफ शेख, शरद तुपविहीरे, सोमनाथ ससे, सचिन चव्हाण आदींनी मोलाचे सहकार्य केले.

# वाहनांवर नियंत्रण आणायला हवे



पुण्यात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर असताना देखील खाजगी वाहन विक्रीत प्रत्येक वर्षी वाढ होत आहे. यंदा पुण्यात उच्चांकी सव्वातीन लाखांपेक्षा जास्त खाजगी वाहनांची विक्री झाल्याची नोंदणी प्रादेशिक परिवहन विभागाकडे (आरटीओ) झाली आहे. त्यामध्ये दुचाकी खरेदीमध्ये वाढ झाली असून पुण्यात दोन लाखांपेक्षा अधिक दुचाकींची खरेदी केल्याचे आढळून आले आहे. आधीच पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात या सव्वातीन लाख वाहनांची भार पडली आहे. पुणे शहरात सध्या ४१ लाखांहून अधिक वाहने आहेत. केवळ पुणे शहरातच एका वर्षात सव्वातीन लाखांपेक्षा अधिक वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई, ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची शक्यता आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे तीन लाख वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

मुंबईत चारचाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ५० लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी जी वाहनतळे आहेत त्यात साधारणपणे दहा हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. पुण्यातही तीच परिस्थिती आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे.

वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. वाहतूक कोंडीमुळे पुणेकर त्रस्त आहेत. रस्त्यावर वाहनांच्या रांगांच्या रांगा लागलेल्या असतात. नागरिकांनी नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्या - मुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

# दिव्यांगांची हेळसांड थांबवा

## अन्यथा आंदोलन छेडण्याचा प्रहारचा इशारा

**अहमदनगर । दत्ता जोगदंड**

अहिल्यानगर जिल्हा ग्रामीण रुग्णालयामार्फत दिव्यांग बांधवांची होणारी हेळसांड तात्काळ थांबवावी, या मागणीसाठी माजी राज्यमंत्री बच्चु कडू यांच्या मार्गदर्शनाखाली प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने जिल्हा रुग्णालयातील शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांना निवेदन देण्यात आले.




या निवेदनात दिव्यांग प्रमाणपत्राची पडताळणी, युनिक आयडी कार्डला आधार कार्ड लिंक करणे, मोबाईल नंबर लिंक करणे तसेच नवीन दिव्यांग प्रमाणपत्र काढणे या प्रक्रियांबाबत निर्माण झालेल्या अडचणी मांडण्यात आल्या. प्रहार दिव्यांग संघटनेचे राज्य उपाध्यक्ष लक्ष्मण पोकळे, जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे, जिल्हा सल्लागार सलीम शेख यांच्या वतीने हे निवेदन सादर करण्यात आले. राज्य व केंद्र शासनाच्या नियमांनुसार दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजनेसह विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणी व युनिक आयडीला आधार लिंक असणे आवश्यक आहे. मात्र, ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास संजय गांधी योजनेचा लाभ बंद होण्याची भीती दिव्यांग बांधवांमध्ये निर्माण झाली आहे.

दर बुधवारी जिल्ह्यातील पाच ते सहा हजार दिव्यांग बांधव जिल्हा रुग्णालयात येत असल्याने मोठी गर्दी होत असून, त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या गर्दीचा गैरफायदा घेत काही ठिकाणी आर्थिक लूट व हेडसाळसाळ होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा असल्याने दिव्यांगांची गैरसोय टाळण्यासाठी प्रत्येक दिवशी एक तालुका याप्रमाणे ऑनलाईन यंत्रणा तयार करून शिबिरांच्या माध्यमातून दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणी, युनिक आयडीला आधार व मोबाईल लिंक करणे तसेच नवीन प्रमाणपत्र काढण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा शासनाकडून मिळणारे संजय गांधी योजनेचे मानधन बंद पडण्याची शक्यता असून, त्यामुळे दिव्यांगांवर अन्याय होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दिव्यांगांवर होत असलेला हा अन्याय व जिल्हा रुग्णालयातील अंधाधुंद कारभार तात्काळ थांबवावा, अन्यथा बच्चु कडू यांच्या मार्गदर्शनाखाली प्रहार संघटनेच्या वतीने उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी राहुरी तालुका अध्यक्ष योगेश लबडे, आजिज शेख, कारभारी मुसमाडे, कुशिनाथ मुसमाडे, मुस्ताक शेख, केशर कराळे, आशाबाई शेख आदी उपस्थित होते.

# शालेय सायकलिंग रोड रेस उत्साहात; २४० खेळाडूंचा सहभाग

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर व सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय सायकलिंग रोड रेस स्पर्धा चांदबीबी महाल, वाळुंज बायपास येथे उत्साहात पार पडली. थंडीच्या वातावरणात सकाळी लवकर सुरू झालेल्या या स्पर्धेत सायकलपटूंनी वेग, सहनशक्ती व उत्कृष्ट फिटनेसचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. राज्यातील सहा विभागांतील एकूण २४० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. १४, १७ व १९ वर्षे वयोगटांतील मुला-मुलींसाठी ५, १० व २० किलोमीटर अंतराच्या एकूण १२ स्पर्धा घेण्यात आल्या. सकाळपासूनच परिसरात सायकलपटूंची वर्दळ वाढली होती. वेगवान सायकलिंग, काटेकोर शिस्त आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे संपूर्ण परिसर गजबजून गेला होता. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, क्रीडा अधिकारी प्रवीण कोंढावळे, विशाल गर्जे, क्रीडा प्रबोधिनीच्या प्राचार्या दिपाली पाटील, प्रा. साईनाथ थोरात, महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे खजिनदार भिकन अंबे, दिपाली शिलडनकर, रावसाहेब बाबर, सायकलिंग असोसिएशनचे सचिव प्रा. संजय साठे, आरती माने, संजय शिंदे, संभाजी मोहिते, स्वप्निल माने, सागर कोळपकर, शैलेश गवळी, प्रायोजक



अविनाश सातपुते, एकलव्य पुरस्कार विजेते सचिन सातपुते, उद्योजक ईश्वर बेरड आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्या दिपाली पाटील यांनी सायकलिंग खेळातील महाराष्ट्राच्या योगदानाबाबत माहिती देताना सांगितले की, आंतरराष्ट्रीय पातळीवर १२० ते १५० किलोमीटर अंतराच्या स्पर्धा घेतल्या जातात, तर शालेय स्तरावर ४० किलोमीटरपर्यंतच्या शर्यती असतात. सायकलिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या सायकलींची किंमत १० ते १५ लाख रुपयांपर्यंत असून खेळाडू ताशी ६० ते ७० किलोमीटर वेगाने सायकल चालवतात, असे त्यांनी नमूद केले. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिस्त, सातत्य व उत्तम फिटनेस यांच्या जोरावरच यश मिळते. कोणत्याही क्षेत्रात कष्टाला पर्याय नाही. नियमित सराव आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी खेळाडूंना पराभवाने खचून न जाता सातत्याने प्रयत्न करत राहण्याचा सल्ला दिला. खेळासोबतच अभ्यासालाही तितकेच महत्त्व द्यावे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी सांगितले की, यश आणि अपयश दोन्ही शांतपणे स्वीकारण्याची सवय खेळाडूंनी लावावी. अपयशातून शिकत पुढे गेले, तर यश हमखास मिळते. स्पर्धेदरम्यान पालकांनी संयम ठेवून पंच व तांत्रिक समितीवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यात सलग १३ राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रावसाहेब बाबर यांनी केले. प्रा. संजय साठे यांनी भारताच्या सायकलिंग संघात १८ ते १९ खेळाडू महाराष्ट्रातील असल्याची माहिती देत, नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाने जनरल चॅम्पियनशिप पटकावल्याचे सांगून सर्वांचे आभार मानले. सकाळी आठ वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी त्यांनी स्वतः सायकल चालवून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग रोड रेस स्पर्धे साठी निवड करण्यात आली आहे.

# भगवानगडावर संत भगवानबाबा पुण्यतिथीची जय्यत तयारी

**बीड । रयत समाचार**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथीनिमित्त रविवार, ता. ४ जानेवारी रोजी श्री क्षेत्र भगवानगड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी भगवानगडावर भव्य मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असून, भाविकांच्या सोयीसाठी सर्व तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. पुण्यतिथीनिमित्त सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसाद तयार करण्यात येणार असून, भाविकांसाठी स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. वाहनांच्या सुयोग्य नियोजनासाठी पोलीस प्रशासनासोबतच घोगस पारगाव व भारजवाडी येथील तरुणांवर विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भाविकांची सुरक्षितता, वाहतूक नियंत्रण व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी राज्यातील विविध भागांतून तसेच अनेक गावांमधून लहान-मोठ्या दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर दाखल होणार आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन मठाधिपती हभप न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली काटेकोरपणे करण्यात येत आहे. रविवारी सकाळी ९ वाजता ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा होणार असून, दुपारी १२ वाजता काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होणार आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती हभप न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या कीर्तनाला भाविकांमध्ये विशेष आकर्षण असते. त्यांच्या प्रभावी आणि रसाळ कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघतो. श्री संत भगवानबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथीनिमित्त रविवारी होणारे काल्याचे कीर्तन भाविकांसाठी पर्वणी ठरणार असून, सर्व भक्तांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पुण्यतिथी सोहळ्यासाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था, महिलांची सुरक्षितता तसेच कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी घोगस पारगाव व भारजवाडी येथील तरुण पोलीस प्रशासनाला सक्रिय सहकार्य करणार आहेत. या सहकार्यामुळे कार्यक्रम शांततेत व शिस्तबद्धरीत्या पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.











